**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- १८.**

**मा.ह प्रभाग समिती सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक – ०३**

**सभावृत्तांत**

दिनांक – ०७/०१/२०२१ वेळ – दुपारी ०२.०० वा.

---

पिंपरी चिचवड महानगरपालिकेच्या मा. ह प्रभाग समितीची मासिक सभा दिनांक ०७/०१/२०२१ रोजी दुपारी ०२.०० वा.ह क्षेत्रीय कार्यालयातील **पं.दीनदयाळ उपाध्याय** सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य/नगरसदस्या उपस्थित होते.

**१) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे - सभापती**

२) मा.शाम गणपतराव लांडे - सदस्य

३) मा.सुजाता सुनिल पालांडे - सदस्या

४) मा. बनसोडे राजू विश्वनाथ - सदस्य

५) मा.आशा धायगुडे – शेंडगे - सदस्या

६) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत - सदस्या

७) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे - सदस्य

८) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत - सदस्य

९) मा.थोरात ज्ञानेश्वर मुरलीधर - स्विकृत सदस्य

१०) मा.संजय गुलाब कणसे - नामनिर्देशीत सदस्य

याशिवाय मा.अभिजीत हराळे - क्षेत्रीय अधिकारी, ह क्षेत्रीय कार्यालय, श्री.सुपे ए.के. लेखाधिकारी, मा.अनिल राऊत – प्र.कार्य.अभियंता स्थापत्य, श्री.विजयसिंह भोसले – उपअभियंता स्थापत्य, श्री.डी.डी.गवळी- उपअभि यंता स्थापत्य, श्री.रामेश्वर मोहाडीकर – उपअभियंता जलनि:सारण, डॉ. दादेवार अ.अ.- ज्येष्ठ वैद्यकिय अधिकारी, वायसीएमएच, श्री.व्ही.के.जाधव- उपअभियंता स्थापत्य उद्यान, श्री.एस.सी.काशिद-उपअभियंता- बीआरटीएस, श्री.जे.व्ही.पटेल – सहा.उद्यान अधिक्षक, श्री.आर.डी.शिरसाठ – उद्यान सहाय्यक, श्री.संतोष लांडगे – उद्यान सहाय्यक, श्री.के.एस.अंदुरे – उपअभियंता, - पापु, श्री.एस.एन.गर्जे – क.अभियंता पाणीपुरवठा, श्री.समीर हनुमान दळवी – क.अभियंता- विद्युत, श्री.शामसुंदर बनसोडे – क.अभियंता विद्युत, श्री.संदीप जीवन लोहकरे- क.अभियंता जलनि:सारण, श्री.बाळासाहेब शेटे – क.अभियंता बीआरटीएस, श्री.निखील फेंडर – क.अभियंता स्थापत्य उद्यान, श्रीम.यादव प्रीती- क.अभियंता जलनि:सारण, श्री.कांबळे विजय –क.अभियंता स्थापत्य, श्री.रमेश जिंतीकर- क.अभियंता जलनि:सारण, श्री.वासुदेव तुकाराम अवसरे- क.अभियंता विद्युत, श्री.मगर एस.एम. – क.अभियंता स्थापत्य, श्री.रमेश भोसले – सहा.आरोग्य अधिकारी, श्री.एस.बी.मानमोडे – आरोग्य निरीक्षक, श्री.उध्दव ज्ञानेश्वर डवरी- आरोग्य निरीक्षक, श्री.चव्हाण एस.एच.-आरोग्य निरीक्षक,

श्री.कोटीयाना.डी.एम.- आरोग्य निरीक्षक पशुवैद्यकिय, श्री.उईके विजयकुमार – विज पर्यवेक्षक विद्युत, सौ. जयश्री साळवी – क्रीडा पर्यवेक्षक इ. उपस्थित होते.

----------

**प्रशासन अधिकारी तथा सचिव** : माहे जानेवारी २०२१ च्या दिनांक ०७/०१/२०२१ रोजीचे सभेचे कामकाज सुरु करण्यास मान्यता मिळावी.

**मा. सभापती** – सर्व सन्मा सदस्य व अधिकारी/कर्मचारी यांचे स्वागत करुन सभेस सुरुवात करणेत येत आहे.

**श्री.तनपुरे रविंद्र, लिपिक** – नमस्कार आज या ठिकाणी प्रभाग समितीच्या सभेमध्ये सर्वांचे स्वागत करतो. प्रभाग समितीचे सभापती सन्मा.हर्षल ढोरे, सर्व सन्मा. सदस्य आणि ह क्षेत्रीय कार्यालयाचे नवनिर्वाचित क्षेत्रीय अधिकारी मा.अभिजीत हराळे यांचे या ठिकाणी स्वागत करुन सत्काराचा कार्यक्रम होणार आहे.

ह क्षेत्रीय कार्यालयाचे क्षेत्रीय अधिकारी मा. अभिजीत हराळे यांनी दिनांक २१/१२/२०२१ रोजी पदभार स्विकारलेला आहे. त्यांचे या ठिकाणी मा.प्रभाग अध्यक्ष यांचे स्वागत करण्यात येत आहे.

**( मा.क्षेत्रीय अधिकारी श्री.अभिजीत हराळे यांचा सत्कार करण्यात आला.)**

**मा.क्षेत्रीय अधिकारी** – सन्मा.सभागृह, सन्मा.प्रभाग अध्यक्ष व सर्व सन्मा सदस्य तसेच सर्व अधिकारी कर्मचारी माझी नुकतीच ह क्षेत्रीय कार्यालयामध्ये ह क्षेत्रीय अधिकारी म्हणून नेमणूक झाली असून मी दिनांक २१/१२/२०२१ रोजी पदभार स्विकारलेला आहे. सोलापूर महापालिकेत सहा.आयुक्त म्हणून कामकाज पाहिले आहे. नंतर जत नगरपरिषदेमध्ये मुख्याधिकारी या पदावर कामकाज करुन ही तिसरी पोस्टींग पिं.चिं.महानगपालिकेतील आहे.

**श्री.तनपुरे रविंद्र – लिपिक** – पिंपरी चिंचवड मधील श्री. समीर हनुमान दळवी व श्री.जाधव यांनी पुणे ते कन्याकुमारी पर्यंत सायकलवरुन प्रवास केला आहे. त्यांचा या सभागृहामध्ये सत्कार करण्यात येत आहे.

**(श्री. समीर हनुमान दळवी व श्री.सुनिल बाळकृष्ण जाधव यांचा सत्कार करण्यात आला.)**

---------

**प्रशासन अधिकारी तथा सचिव सभाशाखा** :सन्मा. सदस्य यांनी सादर केलेले ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणेत आले.

----------

**विषय क्र.१-** प्रभाग क्र. ३० येथील आरक्षण क्र. ३/५सर्व्हे. नं.१६/१८/येथे नव्याने विकसीत होत असलेल्या खेळाच्या मैदानाला नाव देणेबाबत मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे यांचादि. ०७/०१/२०२१ चे पत्र.

**विषय क्र.२ –** प्रभाग क्र.३०येथील आरक्षण क्र.३/१३सर्व्हे.नं.१२/१३ येथे नव्याने विकसीत केलेले वाहनतळ रोहीतराज युवा प्रतिष्ठाण या संस्थेस चालवण्यास मिळणेबाबत. मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे यांचे दिनांक ०७/०१/२०२१ चे पत्र.

**विषय क्र.३-** भिमज्योत नगर येथील समाज मंदिरास रॉबर्ट हॅरी दास नाव देणेबाबत. मा.राजू विश्वनाथ बनसोडे यांचे दिनांक ०७/०१/२०२१ चे पत्र.

**विषय क्र.४** प्रभाग क्र. ३० दापोडीतील जयभीमनगर व फुगेवाडीतील परिसराचे मुख्य प्रवेशद्वार दुरुस्त करणेबाबत. मा.सौ.स्वाती (माई) चंद्रकांत काटे यांचे दिनांक ०७/०१/२०२१ चे पत्र.

**विषय क्र.५-** प्रभाग क्र. ३० दापोडी विभागातील आनंदवन वसाहत येथील व्यायामशाळेला साहित्य मिळणेबाबत. मा.सौ.स्वाती (माई) चंद्रकांत काटे यांचे दिनांक ०७/०१/२०२१ चे पत्र.

**विषय क्र.६-** प्र.क्र. ३० दापोडीतील नालंदा बुध्द विहार (दुमजली) टेरेस वरील बाजूस पत्राशेड उभारणेबाबत. मा.सौ.स्वाती (माई) चंद्रकांत काटे यांचे दिनांक ०७/०१/२०२१ चे पत्र.

**विषय क्र.७-** मुंबई पुणे महामार्गाजवळ पेट्रोल पंप लगत रस्त्यास माता नरंजन कौर चान्ना पथ नामकरण करणे. व नामफलक उभे करणेबाबत. मा.सौ.स्वाती (माई) चंद्रकांत काटे यांचे दिनांक ०७/०१/२०२१ चे पत्र.

--------------

**मा.सभापती –** मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे, मा.राजू बनसोडे नगरसदस्य व मा.स्वाती काटे नगरसदस्या यांनी दाखल केलेले ऐनवेळचे विषय मंजूर करण्यात येत आहे.

----------

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले..**

ठराव क. ०५ विषय क्र.- १

दिनांक – ०७/०१/२०२१ विभाग -

सुचक – मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे अनुमोदक - मा.शाम लांडे

**संदर्भ –** प्रभाग क्र. ३० येथील आरक्षण क्र. ३/५सर्व्हे. नं.१६/१८/येथे नव्याने विकसीत होत असलेल्या खेळाच्या मैदानाला नाव देणेबाबत मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे यांचा दिनांक ०७/०१/२०२१ चे पत्र. वरील विषयान्वये प्रभाग क्र. ३० दापोडी येथील आरक्षण क्र. ३/५ सर्व्हे. नं. १६/१८ एस.बी. पाटील शाळेशेजारी दापोडी येथे म.न.ना.चे नव्याने विकसीत होत असलेल्या खेळाच्या मैदानाला कै. सौ. कमल सुदाम काटे असे नांव देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क. ०६ विषय क्र.- २

दिनांक – ०७/०१/२०२१ विभाग -

सुचक – मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे अनुमोदक - मा.शाम लांडे

संदर्भ – प्रभाग क्र. ३० येथील आरक्षण क्र. ३/१३ सर्व्हे.नं.१२/१३ येथे नव्याने विकसीत केलेले वाहनतळ रोहीतराज युवा प्रतिष्ठाण या संस्थेस चालवण्यास मिळणेबाबत. मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे यांचे दिनांक ०७/०१/२०२१ चे पत्र.

वरील विषयान्वये प्रभाग क्र. ३० दापोडी येथील आरक्षण क्र. ३/१३ सर्व्हे.नं. १२/१३ गणेशनगर, दापोडी येथे म.न.पा. नव्याने विकसीत केलेले वाहनतळ हे दापोडीतील रोहितराज युवा प्रतिष्ठाण या संस्थेस चालविण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क. ०७ विषय क्र.- ३

दिनांक – ०७/०१/२०२१ विभाग -

सुचक – मा.राजू बनसोडे अनुमोदक - मा.सौ.स्वाती (माई) काटे

संदर्भ – भिमज्योत नगर येथील समाज मंदिरास रॉबर्ट हॅरी दास नाव देणेबाबत. मा.राजू विश्वनाथ बनसोडे यांचे दिनांक ०७/०१/२०२१ चे पत्र.

उपरोक्त विषयान्वये दापोडी येथील भिमज्योत नगर रेल्वे लाईन शेजारील नव्याने बांधण्यात समाज मंदिरास रॉबर्ट हॅरी दास यांचे नांव देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क. ०८ विषय क्र.- ४

दिनांक – ०७/०१/२०२१ विभाग -

सुचक – मा.सौ. स्वाती (माई) चंद्रकांत काटे अनुमोदक - मा.राजू बनसोडे

संदर्भ – प्रभाग क्र. ३० दापोडीतील जयभीमनगर व फुगेवाडीतील परिसराचे मुख्य प्रवेशद्वार दुरुस्त करणेबाबत. मा.सौ.स्वाती (माई) चंद्रकांत काटे यांचे दिनांक ०७/०१/२०२१ चे पत्र.

वरील विषयास अनुसरुन पत्र सादर करते की, माझे प्र. क्र. ३० जयभीमनगर व फुगेवाडी परिसरात जवळजवळ पंचवीस हजार नागरीक रहात असून त्या परिसराची मुख्य प्रवेशद्वार पुर्णपणे मोडकळीस आले आहे. त्या अनुषंगाने त्या परिसराची ओळख नाहीशी झाली आहे. तरी लवकरात लवकर हया प्रवेशद्वाराचे डागडुजीकरण (दुरुस्ती) करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क. ०९ विषय क्र.- ५

दिनांक – ०७/०१/२०२१ विभाग -

सुचक – मा.सौ. स्वाती (माई) चंद्रकांत काटे अनुमोदक - मा.राजू बनसोडे

संदर्भ – प्रभाग क्र. ३० दापोडी विभागातील आनंदवन वसाहत येथील व्यायामशाळेला साहित्य मिळणेबाबत. मा.सौ.स्वाती (माई) चंद्रकांत काटे यांचे दिनांक ०७/०१/२०२१ चे पत्र.

वरील विषयास अनुसरुन पत्र सादर करते की, माझ्या प्र.क्र. ३० मधील दापोडी परिसरातील आनंदवन वसाहतमधील युवक तरुणांना व्यायाम करण्याकरीता व्यायाम शाळेतील साहित्य (संपुर्ण) देण्यात यावे. लवकरात लवकर व्यायाम शाळेतील लागणारे सर्व साहित्य त्वरीत देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क. १० विषय क्र.- ६

दिनांक – ०७/०१/२०२१ विभाग -

सुचक – मा.सौ. स्वाती (माई) चंद्रकांत काटे अनुमोदक - मा.राजू बनसोडे

संदर्भ – प्र.क्र. ३० दापोडीतील नालंदा बुध्द विहार (दुमजली) टेरेस वरील बाजूस पत्राशेड उभारणेबाबत. मा.सौ.स्वाती (माई) चंद्रकांत काटे यांचे दिनांक ०७/०१/२०२१ चे पत्र.

वरील वि षयांस अनुसरुन पत्र सादर करते की, माझे प्र.क्र. ३० दापोडीतील पवारवस्ती परि सरातील नालंदा बुध्द वि हार (दुमजली) या वास्तुचे वरील बाजूस (टेरस) पत्राशेड उभारण्यात यावे. जेणेकरुन परि सरातील छोटे छोटे कार्यक्रम घेता येतील. तरी आपणांस नम्र वि नंती आहे की, लवकरात लवकर हे काम करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क. ११ विषय क्र.- ७

दिनांक – ०७/०१/२०२१ विभाग -

सुचक – मा.सौ. स्वाती (माई) चंद्रकांत काटे अनुमोदक - मा.राजू बनसोडे

**संदर्भ –** मुंबई पुणे महामार्गाजवळ पेट्रोल पंप लगत रस्त्यास माता नरंजन कौर चान्ना पथ नामकरण करणे. व नामफलक उभे करणेबाबत. मा.सौ.स्वाती (माई) चंद्रकांत काटे यांचे दि.०७/०१/२०२१ चे पत्र.

वरील विषयास अनुसरुन पत्र सादर करते की, माझे प्रभागातील मुंबई-पुणे महामार्गाजवळ पेट्रोल पंपाशेजारील रस्त्यास माता नरंजन कौर चान्ना पथ असे नामकरण करण्यात यावे. व नांव फलक उभे करण्यात यावे. जेणेकरुन या रस्त्याजवळील परिर नागरीकांच्या व विद्युत कर्मचारी, सफाई कर्मचारी, पोस्ट कर्मचारी यांना पुढील कामकाज करण्यास सोईस्कर होईल. विकासाच्या अनुषंगाने सुंदर पाऊल असेल. लवकरात लवकर जलदगतीने हया कामास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**मा.सभापती** – सर्व प्रथम सर्व सन्मा.नगरसदस्य व सर्व अधिकारी / कर्मचारी यांचे स्वागत करुन आभार मानून ही सभा सुरु करीत आहोत. मा.अभिजीत हराळे यांची पहिलीच मिटींग आहे सर्वांचे वतीने त्यांचे स्वागत करीत आहे. या सभेमध्ये चर्चेला सुरुवात करण्यात यावी.

**मा.स्वाती (माई) काटे -** कासारवाडीमध्ये जे करसंकलन ऑफिस आहे त्या ठिकाणी कोण कर्मचारी आहे. नागरीक टॅक्स भरण्यसाठी येतात त्यांना सहकार्य करीत नाही. जेष्ठ नागरीकांना खूप त्रास होतो हे चुकीचे आहे. क्लार्क कॅशीअरचे काम करतात. त्यांचे काम कोण करणार. एक महिला तीन महिने पासून करसंकलन विभागामध्ये जात आहे. त्या महिलेकडे जातीने लक्ष घालावे.

**मा.आशा शेंडगे** – कालच नळकनेक्शनसाठी अर्ज दिला आहे. नळकनेक्शनचे काम जे करतात त्यांनीच कॅशीअरचे काम करणे हे सोपे नाही. कॅशीअरचे काम करणेमागचे काय कारण आहे. अशा प्रकारे काम चालू असल्यामुळे खूप फाईल पेंडीग आहेत. तीन चार महि न्यांनी फाईल करसंकलन विभागामध्ये मॅडमकडे जातात. काहीही कारवाई होत नाही. कॅशीअर कॅश घ्यायला का बसतो. आपण आपले दिलेले कामकाजात किती काम प्रामाणिक करता. ज्यांचेकडे जे काम आहे ते त्यांनीच करावे. टॅक्सचे ऑफीस दापोडी, फुगेवाडी व कासारवाडी या ठिकाणी आहेत. त्याठिकाणचे कर्मचारी मिटींगला आले पाहिजे.

**मा.सभापती** – कासारवाडी येथील क्लार्कला फोन केला होता का?

**मा.क्षेत्रीय अधिकारी** – या मिटींगच्या अगोदरच करसंकलन विभागाच्या कर्मचा-यांची मिटींग घेतली आहे. कर्मचा-यांकडे गट जास्त आहेत. कॅशीअर सेप्रेट आहे. ऑर्डर दिलेली नाही.

**मा.आशा शेंडगे** – कर्मचा-यांना गट दया व कॅशीअरची नेमणूक करा. एखादा कॅशला हात लावणे हे सोपे नाही. अधिका-यांनी ऑर्डर दिली पाहिजे. याबाबत माहिती दयावी.

**मा.सुजाता पालांडे** – प्र.क्र. २० संपूर्ण खोदून काढला आहे. प्रत्येक घराच्या समोर खोदून ठेवले आहे. स्मार्ट सिटी माझे वॉर्डमध्ये नाही. मला सांगून का खोदाई करीत नाही. हा विषय काय आहे. स्मार्ट सिटी अंतर्गत संपूर्ण रस्ता खोदला आहे. माझा ऐरिया का खोदला जातो याबाबत माहिती दयावी.

**मा.आशा शेंडगे** – ह प्रभागाच्या समोर खोदले जात आहे व पेपरला बातमी आली आहे. त्यांनतर तक्रार क्षेत्रीय अधिकारी यांचेसमोर आली आहे. शहराचा नकाशा असा केला आहे. संबंधीत ठेकेदाराने माझे घरापर्यंत खोदाईचे काम करायचे याबाबत अधिकारी यांना सुध्दा माहिती असणे आवश्यक आहे. आपले शहरात प्रभागाला कनेक्ट करणेसाठी वायरी टाकल्या पाहिजे.

**मा.सुजाता पालांडे -** स्मार्ट सिटी अंतर्गत आमचेकडे काम नाही, माझे वॉर्डमध्ये बजेट नाही. किती महिन्याची माझी तक्रार आहे. आता पेव्हींग ब्लॉकचे काम करावे लागेल. सीसीटीव्ही कॅमेराचे केबल्स आहेत असे वाटत नाही. माझ्या एरियाची स्मार्ट सिटीमुळे व मेट्रोने चाळण केली आहे. त्यांना काम करण्यासाठी कुठे तरी मार्किंग असेल. प्रभाग क्रमांक २० मध्ये काम करावे लागेल. मेट्रोमुळे खोदाई केली याबाबत नगरसदस्यांना काही तरी माहिती दयावी. प्रत्येक वॉर्डसाठी बजेट असते. मेन्टेन्स काही नसेल तर खोदाई कशी करतात. संपुर्ण वॉर्ड खोदला आहे.

**मा.गवळी धनंजय** – पेव्हींग ब्लॉक काढल्यानंतर बसवून देण्यात येणार आहे.

**मा.आशा शेंडगे** – केबलचे काम चालू असताना मी फोटो काढले आहे. त्यावेळेस अधिका-यांना काय काम चालले आहे ते सांगता येत नव्हते. आम्ही काय काम करतो आम्हाला माहिती नाही. ७० टक्के काम झाले आहे. हे सगळे न सांगता काम करत आहे ही वस्तूस्थिती आहे. आम्हाला काहीही माहिती नसते. बाकीचे वॉर्ड चकाचक होत आहेत आमचेकडे बजेट नाही त्यामुळे काम करता येत नाही.

**मा.सुजाता पालांडे** – विभागातून आदेश देण्यात यावे. लवकरात लवकर काम थांबवले पाहिजे.

**मा.राजू बनसोडे** – श्री.समीर दळवी व जाधव यांचे सर्वप्रथम अभिनंदन करतो. स्मार्ट सिटी अंतर्गत काम केले जात आहे. आता नव्यानेच रस्त्याचे काम केले जात आहे. नगरसेवकांना सांगणे कर्तव्य आहे. रस्त्याच एवढे खड्डे झाले आहेत त्यामुळे नागरीक खड्डयात पडताना पाहिले आहे. ताबडतोब त्यांचे काम थांबवावे.

**मा.सुजाता पालांडे** – स्मार्ट सिटीमध्ये काम आहे तर आम्हाला नगरसेवकांना का बोलावले. स्मार्ट सिटी अंतर्गत बरेचसे काम झालेले आहे याची माहिती आम्हाला का देत नाही.

**मा.राजू बनसोडे** – नागरीकांनी प्रश्न विचारले तर आम्हाला सांगता आले पाहिजे. यापुढे अशी कामे बंद करा. आम्हाला पुर्ण माहिती दया. चोरुन काम चालले आहे. सगळे रस्ते खोदले आहेत. विद्युत विभागाने आमचे प्रभागात चांगले एलइडी बल्ब लावून दया. एलइडी बल्ब दयायचे नसेल तर लाईटचे पोल काढले तरी चालेल. एलइडी आमचे येथे नाही. एलइडी विषय खूप दिवसापासून प्रलंबीत आहे.

**मा.क्षेत्रीय अधिकारी** - स्मार्ट सिटीचे अंतर्गत खुदाई केली आहे. कोणते काम केले आहे याबाबत स्मार्ट सिटीला पत्र देण्यात येईल. कामकाज थांबवणेचे अधिकार मा.आयुक्त साहेबांना आहे.

**मा.अंबरनाथ कांबळे** – स्मार्ट सिटीचे अधिकारी मा.आयुक्त साहेबांना आहेत. परंतू प्रभाग क्रमांक २० व ३० या ठिकाणी स्मार्ट सिटीचे काम चालले आहे. याबाबत आम्हाला माहिती पाहिजे.

**मा.सुजाता पालांडे** – आम्हाला आमचे प्रभागात बजेट नसल्यामुळे त्रास होत आहे. बजेटचा विषय आम्ही जनरल बॉडीला बोलू शकत नाही. आमचा हा आपुलकीचा विषय आहे. बजेटबाबत मेजर इश्यू झालेला आहे.

**मा.राजू बनसोडे** – स्मार्ट सिटीचे अधिका-यांना मिटींगला बोलावण्यात यावे.

**मा.अंबरनाथ कांबळे** – दोन दिवसांनी स्मार्ट सिटीच्या अधिका-यांना मिटींगला बोलावण्यात यावे. त्यांचेसाठी मिटींग घेण्यात यावी.

**मा.सभापती** – स्मार्ट सिटी अंतर्गत कामे आहेत याबाबत त्या विभागाच्या अधिका-यांसोबत पुढच्या आठवडयात मिटींग घेण्यात यावी. आजपर्यंत आपण संबंधीत अधिका-यांशी बोललो नाही. त्यामुळे चारही वॉर्डमधील सन्मा.नगरसेवकांसोबत मिटींग लावावी. स्मार्ट सिटीचे सर्व अधिकारी मिटींगला आले पाहिजे. बाकी विभागातील सगळे अधिकारी सुध्दा मिटींगला पाहिजे. अतिक्रमण आता प्रभागाला दिले आहे. अतिक्रमण कारवाई बाबत काय करीत आहे.

**मा.आशा शेंडगे** – सात महिनेपासून अनाधिकृत बांधकाम चालू आहे. आपले शहराची इमारत पाडायची याबाबत अतिक्रमणच्या टीमने व्यवस्थित पाहिले पाहिजे.

**मा.सुजाता पालांडे** – माझे वॉर्डमध्ये दुस-या वॉर्डमधील लोक येऊन अतिक्रमणची कारवाई करतात. कोणीही येऊन कारवाई करणे हे योग्य नाही. अतिक्रमणच्या टीमची एक मिटींग लावणे. आजचे मिटींगला अतिक्रमणचे अधिकारी आले आहेत का?

**मा.शाम लांडे** – सगळयाच विषयाबाबत मिटींग लावावी. सगळे अधिकारी व सगळे नगरसेवक यांना मिटींगला बोलावण्यात यावे. येत्या मंगळवारी दुपारी प्रत्येक विभागाची मिटींग लावणे.

**मा.अंबरनाथ कांबळे** - आजची मिटींग पहिलीच आहे. क्षेत्रीय अधिकारी नवीन आहेत. अधिकारी मिटींगला पहिले आले पाहिजे. सभापतींचा अपमान आहे. सर्व मिटींग प्रभाग अधिका-यांनी हॅण्डल केली पाहिजे. मा. आयुक्तांना अधिकार आहेत असे असेल तर क्षेत्रीय अधिकारी यांना काय अधिकारी आहेत..

**मा.क्षेत्रीय अधिकारी –** दुपारी २.०० वा. मिटींग सुरु झाली का याबाबत विचारणा केली होती.

**मा.ज्ञानेश्वर थोरात –स्विकृत सदस्य –** आजची मिटींग तहकूब करावी. अधिकारीकडून कुठलीही कामे होत नाही. कुठलेही अधिकारी वेळेवर येत नाही. अधिका-यांचा प्रोटोकॉल पाहिजे. नगरसेवकांनी प्रश्न विचारले तर उत्तरे न देणे हे योग्य नाही. लोकांना व्यवस्थित न्याय देत नाही तर काय उपयोग. न्याय व्यवस्थित देत नाही याचे काय कारणआहे? प्रत्येक नगरसदस्यांचे प्रश्नावर उत्तर मिळाले पाहिजे. शहरातील कामे आहेत.

**मा.संजय कणसे –नामनिर्देशित सदस्य -** सभागृहामध्ये अध्यक्षांचा अपमान झाला आहे. आम्ही सर्व नगरसदस्य निषेध करतो. मंगळवारी सर्व अधिकारी उपस्थित राहिले पाहिजे.

**मा.सुजाता पालांडे -** क्षेत्रीय अधिकारी यांचेकडून चूक झाली आहे. त्यांची पहिलीच मिटींग आहे. आपण त्यांना एक संधी देऊ. त्यांनी प्रोटोकॉल पाळायला हवा. त्यांनी त्यांच्या अधिका-यांना ताब्यात ठेवणे त्यांचे काम अहे. मला वाटते पहिलीच मिटींग आहे, वादाची होऊ नये. आपण खूप लोकांचे प्रतिनिधीत्व करतो. त्यामुळे साहेबांना एक संधी देऊ.

मा.अंबरनाथ कांबळे – पशुवैद्यकिय विभागाचे कोणी अधिकारी आले आहेत का? मोकाट कुत्र्यांचा भयंकर त्रास नागरीकांना होत आहे.

**मा.सभापती** – मंगळवार दिनांक १२/०१/२०२१ रोजी दुपारी २.०० वा. सर्व अधिकारी व सर्व नगरसदस्यांसोबत मिटींग घेण्यात येत आहे. सर्वांनी हजर राहावे. याबाबत सर्वांना आदेश देण्यात यावे.

**मा.सभापती** – मा.सर्व नगरसेवक, अधिकारी/कर्मचारी सर्वच मिटींगला उपस्थित राहिले त्याबद्दल सर्वांचे आभार मानतो व मिटींग संपली असे जाहिर करतो.

सही/-
हर्षल मच्छिंद्र ढोरे
सभापती ह प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
कासारवाडी- ३४.

सही/-
प्रशासन अधिकारी तथा सचिव
" ह" क्षेत्रीय कार्यालय
पिपरी चिंचवड महानगरपालिका

जा.क्र.हक्षेका/कावि/१४/२०२१
दिनांक – १९/०१/२०२१